

बाबूजी. अक्षरे केवळ तीनच, पण सातही सूर त्यात ओतप्रोत भरलेले. त्यांचं संगीत म्हणजे काव्याची जाण आणि संगीताचे ज्ञान यांचा अपूर्व संगम असलेली अलौकिक प्रतिभा. गदिमा- सुधीर फडके - राजा परांजपे हे त्रिकूट म्हणजे महाराष्ट्राला पडलेले एक सुंदर स्वप्न होते, असे म्हणतात. सुधीर फडके तथा बाबूजींच्या निधनाने या सरातील तिसरा मोतीही गळाला. खरे तर महाराष्ट्राला पडलेल्या त्या सुंदर स्वप्नाची बाबूजींच्या जाण्याने समाप्तीच झाली आहे.

को ल्हापूरच्या विद्यापीठ हायस्कुलात माझ्या मोठ्या भावाचा गुरुनाथचा मित्र म्हणून राम फडके मला ठाऊक होता. पुढे तो माझा मित्र झाला. शाळेतली प्रार्थना तो म्हणत असे. तेव्हापासूनचा त्याचा माझा ऋणानुबंध जुळला. विद्यापीठ हायस्कुलात माझे वडील शिक्षक होते. राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या या शाळेतले शिक्षक तोफखाने, दीक्षित ही देशप्रेमानं, ध्येयनिष्ठेनं भारलेली माणसं होती. शाळेची जमीन स्वत: सारवणारे, भिंती चितारणारे, शाळेची बाग फुलवणारे, मुलांना पोहायला घेऊन जाणारे शिक्षक कमालीचे साधे होते. पण डॉ. राधाकृष्णन किंवा महात्मा गांधी तपोवनात उतरत, तेव्हा आमच्या शिक्षकांना तिथं पहिल्यांदा बोलावले जाई. अशा वेळी मुलांमध्ये देशभक्तीचं वारं संचारे व त्याचा कोण अभिमान वाटत असे.


रामला मी सुधीर कधी म्हणायला लागलो ते आठवत नाही. श्रीकृष्ण मेळ्यातच त्याचं नाव सुधीर पडलं. तिथं पुरुषोत्तम सोळांकूरकर व लक्ष्मण बेरळेकर देखील गात असत. मेळ्यातल्या वयानंतर बऱ्याच अवधीनंतर सुधीर, लहरी हैदर, ग. दि. माडगूळकर, वसंत पवार एकत्र गप्पांचा, गाण्याचा फड जमवीत. गणपती उत्सवात वसंत पवार, सुधीर गात असत. त्यावेळी कोणतीही वाद्यं येत नसताना मी त्याचा निष्ठावंत साथीदार म्हणून असे. तालमी असोत, कार्यक्रम असोत की गोकुळ अष्टमीचा उत्सव. मी त्याच्या बरोबर असे.

एच.एम.व्ही. कंपनीचं बोलावणं आलं तेव्हा त्या आनंदोत्सवाचा मी साक्षीदार आहे. टांग्याचं भाडं द्यायला पैसे नसायचे तेव्हा सायकलला तानपुरा, पेटी अडकवण्याची कसरत करीत स्टेशनापर्यंत पायपीट करावी लागत असे. त्यात मी देखील थोडी लुडबुड करीत असे. एकच शर्ट नीटनेटका धुवून तो घालत असे.



त्याही वेळी कमालीचा स्पष्टवक्ता, आग्रही, नेहमीच्या बोलण्यात कटाक्षानं मराठी शब्दाचा वापर करणारा असाच मला तो

आठवतो. प्रायव्हेट स्कूलच्या स- घराच्या लाकडी चौकटीवरचं ईं- त्याच्या नावाचं स्पेलिंग आठवतं....



स्वनाची समाती

■ राम गबाले

...च्या ...सं


बेचाळीसच्या आंदोलनाचे मंत्र भारले दिवस विलक्षण घटनांनी भरलेले होते. काही भूमिगत तर काही स्वखुशीनं जेलमध्ये भरती झालेले कार्यकर्ते असत. रंकाळ वेशीत मंगेश देसाईच्या हातातच हॅन्डग्रेनेड फुटला होता. त्या कालखंडावर आम्ही सर्वांनी एकत्र येऊन चित्रपट काढायचा ठरवलं... आम्ही म्हणजे मी, ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, सुनीता, पु. रा. भिडे, सुधीर फडके....

स्वातंत्र्यानंतरची ही गोष्ट आहे. त्याही आधी सुधीर पुण्यात गेलेला होता. तेथे यशवंत पेठकर चित्रपट काढत होते. 'आगे बढ़ो' मुंबईत प्रफुल्ल पिक्चर्समध्ये मा. विनायकांच्याकडे सहायक दिग्दर्शक म्हणून काम करीत होतो. 'बडी माँ'च्या वेळी, 'सुभद्रा'च्या वेळी दिग्दर्शनाचे पाठ घेत होतो.... सुधीरनं मला बोलावून घेतलं. हे यशवंत पेठकर विद्यापीठ हायस्कूलातले. गजानन जागीरदार व मा. विनायकदेखील कोल्हापूरच्या विद्यापीठ हायस्कूलातलेच, आमचे शिक्षक. पुण्यात 'प्रभात'मध्ये पुन्हा सुधीर, मी, पेठकर जमलो. 'आगे बढो'नंतर 'अपराधी' सुरू झाला. अर्ध्यावर आमचं 'वंदे मातरम'चे ठरलं. 'वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम' 'अपराध मीच केला शिक्षा तुझ्या कपाळी' अशी गाणी सुधीरनं केली... स्वत: म्हटलीदेखील....

फारा वर्षांनी पुण्यात रमणबागेत 'एक होते ग.दि.मा.' या कार्यक्रमात मी व सुधीर एकत्र आलो. खूप आठवणी जागवल्या. 'वेद मंत्राहून आम्हा वंद्य मातरम्' हे गीत युवा कलाकार गात होते. सुधीर माझ्याजवळ आला अन् म्हणाला- 'राम आपण खूप दिवसात एकत्र आलो नाही.... तू मुंबईला ये....' आमच्या दोघांची कारकीर्द कधी एकत्र हात गुंफून तर कधी समांतर वाटेनं तर कधी वेगळ्या स्वतंत्र वाटेनं चालत होती. या वाटचालीत आम्ही कधीच भांडलो नाहीत...

पुण्यातल्या लेले वाड्यात- १७ नवी पेठ येथील दिवसांनी, देशमुखवाडीतल्या दिवसांनी मनावर मोहिनी टाकली होती. सुधीर व ललिताबाईच्या लग्नाचा दिवस आठवतो. महंमद रफींनी मंगलाष्टक गायली होती. 'प्रभात'मध्ये लेख, कवी म्हणून आलेल्या अमर वर्मांचे व माणिकवाईचे सूरही जुळत होते. ५० साली मी देखील विवाहबद्ध झालो होतो. माणिक व अमर वर्मा, वसंत सबनीस, सुधीर व ललिता वहिनी, आम्ही दोघं अशी माणसं गाणी, गप्पा यांच्या मैफली जागवत असू. सुनीताबाई, पु.लं.देखील सहभागी होत असत. पहाटे संपलेल्या रेकॉर्डिंगनंतर पिठलं-भाताची मैफल सुरू होत असे....

(पान ४ पाहा)



> कोल्हापूरच्या विद्यापीठ हायस्कुलात मी त्याच्या आवाजातली शाळेची प्रार्थना ऐकली. तेव्हापासून त्याच्या जीवनाची अद्भुत वाटावी अशी पटकथा मी पाहत आलेला आहे. त्याच्या जाण्यानं पटकथेनं गाठलेला 'क्लायमॅक्स'ही पाहत आहे. पूर्णत्वाला गेलेल्या जीवनाचा सुरेल क्लायमॅक्स पाहताना सत्तर वर्षांच्या ऋणानुबंधाच्या आठवणींनी मनात गर्दी केलेली आहे....'

(पान १ वरून) मॉडर्न गेस्ट हाऊसमधल्या साडेतीन आण्याच्या दहीपोह्यांची सुधीरला आठवण येई....

सुधीरबरोबर वंदे मातरम्, जशास तसे, नरवीर तानाजी, जोहार मायबाप, पोस्टातली मुलगी, मोठी माणसं हे चित्रपट केले. त्याला चाल कशी सुचते- पार्श्वसंगीत करताना तो कसा हरवून जातो ते मला ठाऊक होतं. सुरुवातीच्या काळात तो पोवाडे, लावण्या, गझल कसे झोकात म्हणायचा, तेही मी अनुभवलं होतं. त्याच्या संगीताचा स्वर्गीय अनुभव 'गीत रामायण'नं दिला तेही ऐकलं. मनमुराद ऐकलं. हिंदी चित्रपटासाठी त्यानं केलेल्या 'ज्योतिकलश छलके'वर चित्रपटसृष्टीतील मोठमोठी माणसं फिदा झालेली मी पाहिलं. माझ्या 'जिव्हाळा' चित्रपटात तो गाऊन गेलेला होता... त्याच्या अग्रक्रमात संगीत आणि तत्त्वनिष्ठा एकत्र नांदत असलेल्या पाहिल्या. फार मोठी ताकद असलेला सुधीर मात्र मराठी चित्रपटांच्या अंगणात 'रमला... कधी सारं विसरून स्वत:ला गोवामुक्ती संग्रामात झोकून दिलेलं पाहिलं आहे.

आग्रही, तत्त्वनिष्ठ, कर्तृत्ववान सुधीरशी एका तशाच तोलामोलाच्या माणसाशी गाठ पडलेली होती. ग. दि. माडगूळकर. मात्र दोघे एकमेकांचे निस्सीम चाहते. त्यांच्यात एक विलक्षण मैत्र होतं. रुसवा होता- वैर मात्र नव्हतं. हे मी पाहिलं आहे. ओळखलं आहे....

शिवाजी पार्कमधल्या 'शंकर निवास'मध्ये त्याचा बहरलेला प्रपंच पाहिला. असंख्य पुरस्कारांनी घरात दाटीवाटी केलेली आहे. त्याच्या सुरांचा रंग भिंतींना जणू लागलेला आहे. त्याचा श्रीधर चाली देऊ लागला तेव्हा त्याला झालेला आनंद विसरू शकत नाही. श्रीधरचं संगीत त्याला खूप आवडत असे, ते त्याच्या वेगळ्या वळणाचं, स्वतंत्र आहे म्हणून!

असंच एके दिवशी तो म्हणाला- आता धड सूर लागत नाही रे! गाऊ नये असं वाटतं.... आपल्या दोन्ही नातींना घेऊन दोघं घरी आले. पथ्याचं जेवण जेवले. जुन्या दिवसांच्या आठवणींनी डोळ्यात पाणी आणलं.....



त्याच्या सावरकर चित्रपटाच्या सहभागाबद्दल मला विचारलं जातं- मी म्हणेन अति स्नेहानं बांधलेल्या नात्यामुळंच मी तो चित्रपट स्वीकारला अन् घट्ट विणलेल्या मैत्रीच्या धाग्यामुळंच तो सोडला देखील.....

एका सच्चा देशभक्तीत झोकून दिलेल्या माझ्या जीवाभावाच्या मित्राबद्दल कसं बोलू- काय बोलू....जसं त्याच्या शब्दांच्या स्पष्ट उच्चारणाबद्दल बोलावसं वाटतं- आणि त्याच्या संगीतातल्या विरामचिन्हांबद्दल- त्यातील सायलेन्सबद्दलही.... त्याच्या जीवनाची सुरेल पटकथा सुरुवातीपासून मी पाहिलेली आहे.... आज त्याचा क्लायमॅक्स झालेला आहे.... ती पूर्णत्वास गेलेली आहे.... त्याचा मी एक साक्षीदार आहे.

■ शब्दांकन : सुलभा तेरणीकर